| | |
|---|---|
| MHKO110008442012 | **नियमित दिवाणी दावा क्र. ३३३/२०१२ मधील नि. क्र. १४१ खालील आदेश**<br><br>**नाना कांबळे वगैरे**<br>**वि.**<br>**हिराबाई कांबळे वगैरे.** |

सदरचा अर्ज वादी यांनी वादी क्र. ३(२) कै. विकासस सीताराम कांबळे यांचा मृत्यू दाखला व वारसांची माहिती दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जाखाली त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व अर्ज मंजूर करणेस आक्षेप नोंदवला आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द कायम मनाई व हक्कज्ञापना करीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामातील वादी क्र. ३ चे वारस कै. विकास सीताराम कांबळे हे दिनांक २२/०७/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे यातील वादी क्र. ३(२) कै. विलास सीताराम कांबळे यांचेकरिता प्रस्तुतचा दावा अबेट झाला आहे. वादी क्र. ३(२) कै. विकास सीताराम कांबळे यांचा मृत्यू झाल्यानंतर यातील वादी यांना त्यांच्या मृत्यूची कल्पना वकिलांना सांगायचे ज्ञान नव्हते. तसेच त्यांचा मृत्यूचा दाखला मिळणेस विलंब झाल्याने याकामी त्यांचे वारसांची माहिती व मृत्यूचा दाखला वकीलांना वेळेत देणे वादी यांना शकय झाले नाही. त्यामुळे, सदर वादी क्र. ३(२) कै. विकास सीताराम कांबळे यांचे वारसांची माहिती व मृत्यूचा दाखला दाखल करणेस झालेला विलंब माफ करून मिळावा. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी वादी विनंती करतात.

०३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जाखाली दिले आहे. ते कथन करतात की, अर्जामध्ये नमूद केलेली सर्व कथने चुकीची व लबाडीची आहेत. प्रतिवादींना त्रास देण्याच्या हेतूने वादींनी जाणूबूजून प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस

विलंब केलेला आहे. तथापि, वादींनी अर्ज दाखल करणेस १ वर्षे १ महिना ११ दिवसांचा केलेला विलंब विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी प्रतिवादी विनंती करतात.

०४. अर्ज व अर्जातील कारणे यांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदरचा दावा हा कायम मनाई व हक्कज्ञापना करीता दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा अंतिम युक्तिवादा करिता नेमलेला आहे. वादी यांनी सदर अर्जातील दिलेली कारणे ही संयुक्तीक नाहीत परंतू सदर काम गुणदोषांवर चालून निकाली होणेचे दृष्टीने वादी क्र. ३(२) कै. विकास सीताराम कांबळे यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. तथापि, वादी क्र. ३(२) चे वारस रेकॉर्ड वर घेणेकरिता १ वर्षाहून जास्त कालावधी लागला आले. वादी यांना वादी क्र. ३(२) मयत आहेत हे माहिती असून देखील त्यांनी वारसांना रेकॉर्डवर घेण्यास विलंब केलेला आहे. सदर कामी झालेला विलंब माफ करून वादी क्र. ३(२) कै. विकास सीताराम यांचे वारस रेकॉर्टवर घेणेस परवानगी देणे न्यायोचित होईल व त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही परंतु वादीच्या निष्काळजीपणा बद्दल प्रतिवादींना भरपाई देणे गरजेचे आहे. सबब, न्यायाच्या कारणास्तव पुढील आदेश पारीत करण्यात येतो-

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रू. ३००/- देण्याच्या अटीवर नि. १४१ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो. |

स्वाक्षरी/-

**दिनांकः- ११/०९/२०२५.**
**पेठवडगांव**

**( आर. एस. मोरे )**
**३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**पेठवडगांव**